हिंगोली.
दिनांक :— १३.११.२०१९

**<u>प्रेसनोट</u>**

**लोकसेवक सिध्दार्थ गोविंदराव खंदारे, कृषी अधिकारी, पंचायत समिती औंढा (ना.), रा. शिवाजी नगर, वसमत यांनी १०,०००/—रू. ची लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल झाले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक ११.११.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे वडिलांचे नावे असलेल्या पिंपळदरी शेत शिवारातील गट क्र. २५९ मधील शेतात बिरसामुंडा कृषी क्रांती या योजनेतून खोदलेल्या सिंचन विहिरीची मोजमाप पुस्तीकेत नोंद करून विहीर खोदकामाची रक्कम त्यांचे ओळखीने पंचायत समितीमधुन मंजूर करून देऊन वडिलांचे खात्यात जमा करून देण्यासाठी श्री खंदारे, कृषी अधिकारी, पंचायत समिती औंढा (ना.) हे १०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत मागणी असल्याबाबत अॅ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली होती.

त्यावरून करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक खंदारे, कृषी अधिकारी, पंचायत समिती औंढा (ना.) यांनी तक्रारदार यांना १०,०००/— रू. ची लाचेची मागणी केली होती. त्यावरून दिनांक १२.११.२०१९ रोजी पंचायत समिती औंढा (ना.) येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक खंदारे, कृषी अधिकारी यांना संशय आल्याने ते तक्रारदाराकडून लाचेची रक्कम न स्विकारता निघून गेलेत. त्यावरून दिनांक १२.११.२०१९ रोजी रात्री उशीरा पोलीस स्टेशन औंढा (ना.) येथे गु.र.क्र. २४६/२०१९ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली हे करीत आहेत. ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, व मा. श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख यांनी पोलीस निरीक्षक श्रीमती ममता अफुने, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारूद्र कबाडे, पोना श्री पंचलिंगे, पोना श्री मुंढे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.—१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५,
**मोबाईल क्रमांक :—** ८८८७१७९९९, ९९२३०४२५६५ व ८३९०७६१५०३.

Scanned by CamScanner